| MHRG080000522013 | **रे.मु.क्र. १/२०१३**<br>श्रीमती शांता पदु मोर—महार वगैरे<br>**वि.**<br>रमेश दत्तात्रेय दळवी वगैरे ४ |
|---|---|

## निशाणी ४८ वर आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ तर्फे **दिवाणी प्रक्रिया संहीता आदेश कलम १०** प्रमाणे दाखल केलेला आहे.

२. प्रस्तुतच्या अर्जातील कथने थोडक्यात खालीलप्रमाणे :—

सदरचा दावा ठरावाकरीता व निरंतर मनाई हुकूम मिळणेकरीता दाखल करण्यात आलेला आहे. सदर प्रकरणात मुद्दे निघालेले असून उलटतपास घेण्याकरीता प्रकरण प्रलंबित आहे. वादीने सदरचा दावा दाखल करण्यापूर्वी रे.मु.क्र.३०/२०१२ प्रतिवादी क्र.१ विरुद्ध दाखल केला होता. त्या दाव्यातील कथने, विनंती व दावा मिळकत एकच आहे. सदरचा दावा निकाली होउन प्रस्तुत प्रतिवादीने अपील क्र. २६५/२०१९ दाखल केलेले आहे. रे.मु.क्र.३०/२०१२ मधील निशाणी १६ वर झालेल्या आदेशाचा फायदा घेवून त्या दाव्यातील विनंत्या व कथने न बदलता प्रस्तुतचा दावा दाखल केल्याचे दिसून येत आहे. सदरच्या दाव्यातील मजकूर हा त्या दाव्यातील मजकूराप्रमाणे असून या दाव्यामध्ये पुरावा घेवून तो अंतिम निर्णयापर्यंत नेणे कायद्याने योग्य होणार नाही. त्यामुळे मा.जिल्हा न्यायालयामधील अपिल प्रलंबित असे पर्यंत प्रस्तुतचे प्रकरण स्थगित करणे आवश्यक आहे. याकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

३. वादीतर्फे प्रस्तुत अर्जावर निशाणी ५० वर म्हणणे दाखल करण्यात आलेले आहे त्या म्हणण्याप्रमाणे प्रस्तुतचा अर्ज खोटा व लबाडीचा असून वादींना मान्य नाही. रे.मु.क्र.३०/२०१२ हा केवळ प्रतिवादी क्र.१ विरुद्ध होता. त्या दाव्यामध्ये वादीने सदर प्रतिवादी विरुद्ध मालकी हक्काचा ठराव मिळण्याची

मागणी व मनाई हुकूम मिळण्याची मागणी केली होती. त्यावर निर्णय होवून अपिल प्रलंबित आहे. या दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.२ ते ५ यांनी दावा मिळकतींबाबत वाद प्रलंबित असतांना लिस पेन्डस या तत्वाचे उल्लंघन करुन वादीचे फसवणूक करुन खरेदीखत करुन घेतलेले आहे. त्याबाबत दिनांक २९/०२/२०१२ रोजी माहिती मिळाल्यानंतर रे.मु.क्र.३०/२०१२ मध्ये प्रतिवादी क्र.२ ते ५ यांनी सामिल करुन घेणेसाठी अर्ज दिला होता. परंतु न्यायालयाने निशाणी १६ वरील आदेशामध्ये स्वतंत्र दावा दाखल करण्याचे आदेश दिले. त्यामुळे सदरचा दावा दाखल केलेला आहे. या दाव्यामध्ये तांत्रिक दोष राहू नये म्हणून प्रतिवादी क्र.१ यास दाव्यात सामिल केलेले आहे. सदरचा दावा चौकशी साठी नेमलेला आहे त्यामुळे दोन्ही प्रकरणे एकाच न्यायालयात प्रलंबित नाहीत. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

४. अर्ज व म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादीतर्फे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

५. रे.मु.क्र.३०/२०१२ चे अवलोकन केले असता त्यामध्ये मालकीचा जाहीर ठराव, निरंतर मनाई हुकूम या मागण्या मंजूर करण्यात आलेल्या आहेत. त्यावर मा.जिल्हा न्यायालय, पनवेल येथे अपिल प्रलंबित असल्याची बाब देखील वादातील नाही. रे.मु.क्र.३०/२०१२ मधील आदेशाप्रमाणे प्रस्तुतचा दावा वादीने दाखल केलेला आहे. परंतु त्या दाव्यातील दावा मिळकती, दाव्यातील मागणी व प्रस्तुत दाव्यातील मागणी त्याचप्रमाणे वाद विषयी हे एकच आहेत. दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १० मधील तरतुदीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, न्यायानिर्णयावर दाखल केलेले अपिल हे म्हणजे दावा पुढे चालू ठेवणे असा अर्थ होतो. कलम १० मधील तरतूदीप्रमाणे त्याच पक्षकारांमध्ये, एकाच मिळकतींबाबत व त्याच मागण्यांकरीता स्वतंत्र दावा नंतर दाखल होत असेल तर, त्यामध्ये (Trial) म्हणजेच सुनावणी नंतर दाखल केलेल्या दाव्यामध्ये स्थगित करण्यात यावी असे नमुद आहे. कारण तसे न

केल्यास दाव्यांमध्ये गुंतागुंत वाढू शकते व परस्पर विरोधी निर्णय होवू शकतात. अशा परिस्थितीत प्रस्तुत दाव्यात केवळ प्रतिवादी क्र.२ ते ५ हेच वेगळे पक्षकार असून दावा मिळकत व त्याबाबत करण्यात आलेली मागणी ही जाहीर ठरावाची त्याचप्रमाणे निरंतर मनाई हुकूमाची आहे. त्यामुळे रे.मु.क्र.३०/२०१२ मधील न्यायनिर्णयावर दाखल करण्यात आलेले आहे म्हणजेच तो दावा पुढे चालू असा अर्थ होतो. त्यामुळे सदर प्रकरणात सुनावणी घेणे कायदेशीर दृष्ट्या योग्य होणार नाही. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आदेश

१. अर्ज निशाणी ४८ मंजूर करण्यात येतो.

२. प्रस्तुत दाव्याची सुनावणी अपिल क्र. २६५/२०१९ चा अंतिम निर्णय होईपर्यंत स्थगित करण्यात येते.

दिनांक :— ०९/०६/२०२६.
स्थळ :— खालापुर.

**( श्रीमती एस.एस.देशमुख )**
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
खालापुर.